# प्रकरण ४ थे
# रेंदाळमधील विकासकामांचे वर्गीकरण

४.१ प्रस्तावना

४.२ प्रश्नावलीतील विभागणी

४.३ प्रश्नावलीचे वर्गीकरण

४.४ समारोप

संदर्भसूची



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण ४ थे
# रेंदाळमधील विकासकामांचे वर्गीकरण

## ४.१ प्रस्तावना :

"तिसऱ्या प्रकरणामध्ये रेंदाळ गावातील जलस्वराज्य प्रकल्पाचा अभ्यास केला आहे. रेंदाळने प्रकल्पाच्या माध्यमातून राबविलेल्या विकासकामांचा आढावा घेतला आहे. प्रस्तुत प्रकरणात रेंदाळने राबविलेल्या उपक्रमांचे वर्गीकरण केले आहे. दि. २६/०२/०९ व दि. ०५/०३/०९ रोजी रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर या गावास प्रत्यक्ष भेट देवून उत्तरदात्यांकडून माहिती घेतलेली आहे. एकूण ४० महिला व ४० पुरुष अशा एकूण ८० ग्रामस्थांकडून प्रश्नावली भरुन घेतलेली आहे. त्या प्रश्नावलींचे वर्गीकरण प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेले आहे."१

## ४.२ प्रश्नावलीची विभागणी :

"प्रश्नावली एकूण मुख्य तीन भागात विभागली आहे.

अ) लोकसहभागाविषयी प्रश्न

ब) विकासासंदर्भातील प्रश्न

क) महिला सक्षमीकरणासंदर्भातील प्रश्न

या प्रमुख तीन विभागामध्ये एकूण २८ प्रश्नांचा समावेश केला आहे. लोकसहभागाविषयी १० प्रश्न, विकासासंदर्भातील ११ प्रश्न, महिला सक्षमीकरणासंदर्भातील ७ प्रश्न अशी २८ प्रश्नांची विभागणी करण्यात आलेली आहे."२ सदर प्रश्नांना ८० उत्तरदात्यांनी जी उत्तरे दिली त्या उत्तरांचे वर्गीकरण प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेले आहे.

## ४.३ प्रश्नावलीचे वर्गीकरण :

प्रमुख तीन विभागातील प्रश्नांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे :

### अ) लोकसहभागाविषयी प्रश्न :

प्रश्न - १ : जलस्वराज्य प्रकल्प कशासाठी आहे ?

सारणी क्र. (अ - १)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | पाणी, स्वच्छता व महिला सक्षमीकरण | १३ | १८ | ३१ |
| २ | पाणी व ग्रामस्वच्छता | ०६ | ०७ | १३ |
| ३ | पाण्यासाठी | १९ | १२ | ३१ |
| ४ | माहीत नाही | ०२ | ०३ | ०५ |

सारणी क्र. (अ - १) वरुन असे दिसते की, एकूण ८० उत्तरदात्यांपैकी ७५ उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्प हा पिण्याच्या पाण्यासाठी आहे असे सांगितले आहे. जलस्वराज्य प्रकल्पाचे मुख्य तीन उद्देश १३ पुरुष व १८ महिला अशा एकूण ३१ जणांना माहित आहेत. जलस्वराज्य प्रकल्प पाणी व ग्रामस्वच्छता यासाठी आहे असे १३ लोकांचे उत्तर आहे. पिण्याच्या पाण्यासाठी गावात प्रकल्प सुरु झाला आहे असे ३१ जणांनी उत्तर दिले आहे. तर २ पुरुष व ३ महिलांना गावात प्रकल्प सुरु आहे हे माहित आहे पण तो कशासाठी आहे हे माहित नाही.

प्रश्न - २ : गावात प्रकल्प कधी सुरु झाला ?

सारणी क्र. (अ - २)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | डिसेंबर २००५ | ०४ | ०६ | १० |
| २ | मार्च २००६ | ३५ | १८ | ५३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | निश्चित सांगता येणार नाही | ०१ | १६ | १७ |

सारणी क्र. (अ - २) नुसार गावात प्रकल्प कधी सुरु झाला हे ६३ ग्रामस्थांना माहित आहे. डिसेंबर २००५ मध्ये जिल्हा परिषदेकडून गावाला जलस्वराज्य प्रकल्प मंजूरीचे पत्र मिळाले. त्यामुळे एकूण १० उत्तरदात्यांनी डिसेंबर २००५ मध्ये प्रकल्प सुरु झ्ााला असे सांगितले. प्रत्यक्ष कामास सुरवात मार्च २००६ पासून झाली, त्यामुळे ५३ उत्तरदात्यांनी मार्च २००६ असे उत्तर दिले. उर्वरित १७ उत्तरदात्यांना गावात प्रकल्प सुरु आहे हे माहित आहे पण निश्चित महिना किंवा वर्षे सांगता आले नाही.

प्रश्न - ३ : ग्रामसभा व महिला ग्रामसभेसाठी उपस्थित राहत होता का ?

सारणी क्र. (अ - ३)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | ३६ | ३२ | ६८ |
| २ | नाही | ०४ | ०८ | १२ |

सारणी क्र. (अ - ३) वरुन असे दिसते की, ४० पुरुषांपैकी ३६ पुरुष ग्रामसभेसाठी उपस्थित राहत होते. ४ लोकांनी नाही किंवा नियमितपणे नाही असे उत्तर दिले आहे. महिलांचे हेच प्रमाण ३२ इतके आहे. ८ महिलांनी महिला किंवा सर्वसाधारण ग्रामसभेसाठी उपस्थित राहत नसल्याचे सांगितले. ८० उत्तरदात्यांपैकी ६८ उत्तरदात्यांनी ग्रामसभेसाठी उपस्थित राहत असल्याचे सांगितले.

प्रश्न - ४ : अभ्याससहलीसाठी कोणत्या गावाला भेट दिली ?

सारणी क्र. (अ - ४)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | कवठेपिराण, जि सांगली | २४ | १४ | ३८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | कवठेपिराण,मयुर दूध, स्वयंसिद्धा | ० | ०२ | ०२ |
| ३ | कवठेपिराण, स्वयंसिद्धा | ०४ | १६ | २० |
| ४ | कुठेच नाही | १२ | ०८ | २० |

सारणी क्र. (अ - ४) वरुन असे दिसते की, जलस्वराज्य प्रकल्पातंर्गत पहिला अभ्यासदौरा ग्रा.पं.कवठेपिराण, जि. सांगली येथे गेला होता. या अभ्यासदौऱ्यामध्ये २४ पुरुष व १४ महिला असे ३८ ग्रामस्थ सहभागी झाले. स्वयंसिद्धा या कोल्हापूर येथील व्यावसायिक संस्थेला भेट दिल्याचे एकूण १८ महिला व ४ पुरुषांनी सांगितले. कवठेपिराण, मयुर दुध संघ आणि स्वयंसिद्धा अशा तीन ठिकाणी २ महिला गेल्याचे दिसते. ८० पैकी १२ पुरुष व ०८ महिलांनी कुठेच अभ्यासदौऱ्यासाठी गेले नसल्याचे सांगितले.

प्रश्न - ५ : आपण लोकवर्गणी भरली आहे का ? किती ?

सारणी क्र. (अ - ५)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | ३७ | ३८ | ७५ |
| २ | नाही | ०३ | ०२ | ०५ |

सारणी क्र. (अ - ५) वरुन असे दिसून येते की, लोकवर्गणी भरली आहे काय? या प्रश्नाला ३७ पुरुष व ३८ महिला यांनी होय असे उत्तर दिले. तर ३ पुरुष व २ महिलांनी आम्ही लोकवर्गणी भरली नाही असे उत्तर दिले. ८० पैकी ७५ उत्तरदात्यांनी लोकवर्गणी भरल्याचे सांगितले. लोकवर्गणीची रक्कम मात्र वेगवेगळी आहे. २५० रु. पासून ५,००० पर्यंत लोकवर्गणी भरल्याचे सांगितले. वर्गणीच्या रकमेमध्ये असमानता आहे. प्रत्येकाने आपल्या ऐपतीप्रमाणे लोकवर्गणी भरली आहे.

प्रश्न - ६ : क्षमता बांधणीसाठी झालेल्या प्रशिक्षणांचा आपण लाभ घेतला आहे का ?

सारणी क्र. (अ - ६)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | २२ | २८ | ५० |
| २ | नाही | १८ | १२ | ३० |

सारणी क्र. (अ - ६) वरुन असे लक्षात येते की, प्रकल्प गावात सुरु झाल्यानंतर ग्रामस्थांच्या क्षमता बांधणीसाठी जी प्रशिक्षणे घेतली गेली त्या प्रशिक्षणांचा लाभ २२ पुरुष व २८ महिला अशा एकूण ५० उत्तरदात्यांनी घेतला आहे. १८ पुरुष व १२ महिलांनी आम्ही प्रशिक्षणांचा लाभ घेतला नाही असे उत्तर दिले. ८० उत्तरदात्यांपैकी ५० उत्तरदात्यांनी प्रशिक्षणाला हजेरी लावली तर ३० उत्तरदात्यांना प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली नाही.

प्रश्न - ७ : उपप्रकल्प १ अंतर्गत घेण्यात आलेल्या प्रशिक्षणांचा आपण लाभ घेतला आहे का ?

सारणी क्र. (अ - ७)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | १६ | २७ | ३३ |
| २ | नाही | २४ | १३ | ३७ |

सारणी क्र. (अ - ७) वरुन असे दिसते की, उपप्रकल्प १ अंतर्गत झालेल्या प्रशिक्षणांचा लाभ १६ पुरुष व २७ महिला अशा एकूण ३३ उत्तरदात्यांनी घेतला आहे. २४ पुरुष व १३ महिलांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला नाही असे उत्तर दिले. ८० पैकी ३३ उत्तरदात्यांनी प्रशिक्षणाला हजेरी लावली आहे.

प्रश्न - ८ : उपप्रकल्प ३ अंतर्गत घेण्यात आलेल्या प्रशिक्षणांचा आपण लाभ घेतला आहे का ?

सारणी क्र. (अ - ८)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | ०२ | ३४ | ३६ |
| २ | नाही | ३८ | ०६ | ४४ |

सारणी क्र. (अ - ८) वरुन असे दिसते की, उपप्रकल्प ३ अंतर्गत आयोजित केलेली प्रशिक्षणे ही प्रामुख्याने महिलांसाठी होती. त्यामुळे ४० पैकी २ पुरुषांनी या प्रशिक्षणांचा लाभ घेतला असे सांगितले. ४० महिला उत्तरदात्यांपैकी ३४ महिलांनी महिलांसाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षणांचा लाभ घेतला आहे. ६ महिलांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला नसल्याचे सांगितले.

प्रश्न - ९ : पाणीपुरवठा योजनेचे साहित्य खरेदी करण्यासाठी आपण गेला होता का ?

सारणी क्र. (अ - ९)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | २२ | १४ | ३६ |
| २ | नाही | १८ | २६ | ४४ |

सारणी क्र. (अ - ९) वरुन असे दिसते की, ४० पुरुष उत्तरदात्यांपैकी २२ उत्तरदात्यांनी पाणीपुरवठा योजनेचे साहित्य खरेदी करण्यासाठी गेलो होतो असे उत्तर दिले. १८ उत्तरदात्यांनी नाही असे उत्तर दिले. ४० महिला उत्तरदात्यांपैकी १४ महिलांनी होय असे तर २६ महिलांनी नाही असे उत्तर दिले. एकूण ८० प्रश्नावलीमधील ३६ प्रश्नावलींमध्ये होय असे उत्तर पाहवयास मिळाले.

प्रश्न - १० : जलस्वराज्य प्रकल्प ही संकल्पना आपणास समजली आहे का ?

सारणी क्र. (अ - १०)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | ३४ | २५ | ५९ |
| २ | नाही, सांगता येत नाही | ०६ | १५ | २१ |

सारणी क्र. (अ - १०) वरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्पाचे उद्देश, ध्येय किंवा जलस्वराज्य प्रकल्प ही संकल्पना समजली असल्याचे ३४ पुरुष व २५ महिलांनी सांगितले. ६ पुरुष व १५ महिलांनी जलस्वराज्य प्रकल्प कशासाठी आहे हे माहित आहे पण संकल्पना म्हणजे काय हे समजले नसल्याचे सांगितले. ८० उत्तरदात्यांपेकी ५९ उत्तरदात्यांना जलस्वराज्य प्रकल्पाची संकल्पना समजली आहे.

## ब) विकासासंदर्भातील प्रश्न :

प्रश्न - १ : प्रकल्पापूर्वी पिण्याचे पाणी कोठून उपलब्ध होत होते ? पिण्यासाठी ते पुरेसे होते का ?

सारणी क्र. (ब - १)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रादेशिक योजना पंचगंगा नदी, अस्वच्छ, अपुरे, प्रदूषित, १० ते १२ दिवसातून एकदा | २९ | २७ | ५६ |
| २ | एम.आय.डी.सी. , अपुरे | ०८ | ०८ | १६ |
| ३ | विहिर, बोअरवेल- प्रदूषित व अपुरे | ०३ | ०५ | ०८ |

सारणी क्र. (ब - १) वरुन असे स्पष्ट होते की, पंचगंगा नदीचे प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेतून प्राप्त होणारे पाणी रेंदाळकरांना जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी उपलब्ध होत होते. ८० पुरुष व महिला उत्तरदात्यांपैकी ५६ उत्तरदात्यांनी प्रादेशिक

योजनेतील पाणी मिळत होते असे सांगितले आहे. परंतु त्याचा कालावधी दहा ते बारा दिवसातून एकदा असे सांगितले. तसेच ते पाणी पिण्यासाठी अपुरे व अस्वच्छ होते. प्रत्येकी ८ महिला व ८ पुरुषांनी एम.आय.डी.सी. भागातून पाणी पिण्यासाठी आणत होतो असे सांगितले. ३ पुरुष व ५ महिलांनी सार्वजनिक विहिर, बोअरवेल यांचा पिण्याच्या पाण्यासाठी उपयोग करत असल्याचे सांगितले. ८० पैकी सर्वच्या सर्व उत्तरदात्यांनी वरील स्त्रोतांद्वारे मिळणारे पाणी पिण्यासाठी पुरेसे नसल्याचे तसेच ते अस्वच्छ व प्रदूषित असल्याचे सांगितले.

प्रश्न - २ : आपल्याकडे वैयक्तिक नळ कनेक्शन आहे का ?

सारणी क्र. (ब - २)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्पापूर्वी होते | १७ | ०८ | २५ |
| २ | प्रकल्पानंतर | २० | ३० | ५० |
| ३ | अद्याप नाही | ०३ | ०२ | ०५ |

सारणी क्र. (ब - २) वरुन असे दिसते की, प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी गावात पाणीपुरवठा सुरु होता. तेव्हा ४० पुरुष उत्तरदात्यांपैकी १७ उत्तरदात्यांकडे वैयक्तिक नळ कनेक्शन होते. तर ४० पैकी फक्त ८ महिला उत्तरदात्यांकडे वैयक्तिक नळ कनेक्शन होते. प्रकल्पानंतर २० पुरुष व ३० महिला उत्तरदात्यांना वैयक्तिक नळ कनेक्शन प्राप्त झाले आहेत. ३ पुरुष व २ महिला उत्तरदात्यांनी अद्याप त्यांच्याकडे कनेक्शन नसल्याचे सांगितले. ८० पैकी ७५ लोकांकडे आज रोजी नळ कनेक्शन आहे.

प्रश्न - ३ : प्रकल्पातंर्गत सुरु झालेल्या योजनेतून आपल्याला रोज पुरेसे व शुद्ध पाणी मिळते का ?

सारणी क्र. (ब - ३)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | ३९ | ३९ | ७८ |
| २ | नाही | ०१ | ०१ | ०२ |

सारणी क्र. (ब - ३) वरुन असे स्पष्ट होते की, प्रश्नावलीमध्ये सहभागी झालेल्या ८० पैकी ७८ उत्तरदात्यांनी जलस्वराज्य प्रकल्पातून सुरु झालेल्या नळपाणीपुरवठा योजनेतून प्राप्त झालेले पाणी पुरेसे व स्वच्छ असल्याचे सांगितले आहे. त्यामध्ये प्रत्येकी ३९ महिला व पुरुष उत्तरदात्यांचा समावेश आहे. तर दोन उत्तरदात्यांनी प्राप्त होणारे पाणी पुरेसे व शुद्ध नसल्याचे सांगितले आहे. त्यामध्ये प्रत्येकी एक महिला व पुरुष उत्तरदात्याचा समावेश आहे.

प्रश्न - ४ : पाणीपुरवठा योजनेतंर्गत गावात कोणती उपांगे (सुविधा उभ्या राहिल्या आहेत?

सारणी क्र. (ब - ४)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | उंच टाकी, जॅकवेल, फिल्टर हाऊस, पंप हाऊस, मिटर पद्धती | १९ | १५ | ३४ |
| २ | उंच टाकी, फिल्टर हाऊस | २१ | ३५ | ५६ |

सारणी क्र. (ब - ४) वरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्पातंर्गत गावात निर्माण झालेल्या पाणीपुरवठा योजनेची सर्व उपांगे ४० पैकी १९ पुरुष व १५ महिलांना माहित आहेत. तर २१ पुरुष व ३५ महिलांनी प्रकल्पांतर्गत उंच टाकी व फिल्टर हाऊस झाल्याचे सांगितले. ८० पैकी ८० उत्तरदात्यांना प्रकल्पातंर्गत उभी राहिलेली उपांगे माहित आहेत.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रश्न - ५ : जिल्हा परिषदेमध्ये काम करणाया अधिकाऱ्यांना आपण ओळखता का ? नावे सांगा.

सारणी क्र. (ब - ५)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | २५ | २१ | ४६ |
| २ | नावे सांगता येत नाहीत | १५ | १९ | ३४ |

सारणी क्र. (ब - ५) वरुन असे दिसते की, प्रश्नावलीमध्ये सहभागी झालेल्या ८० उत्तरदात्यांपैकी ४६ लोकांनी आम्ही जिल्हा परिषदेमधील अधिकाऱ्यांना ओळखतो असे उत्तर दिले. त्यामध्ये २५ पुरुष व २१ महिलांचा समावेश होता. १५ पुरुष व १९ महिला उत्तरदात्यांनी आम्ही अधिकाऱ्यांना ओळखतो पण नावे सांगता येत नाहीत असे उत्तर दिले. पाणीपुरवठा समितीतील लोकांना अभियंता, गटप्रमुख, भूजलतज्ज्ञ, सामाजिक तज्ज्ञ माहित आहेत. ४६ पैकी २१ महिलांनी जलस्वराज्य प्रकल्पात काम करणाया स्त्री-पुरुष समानता तज्ज्ञ आपल्याला माहित असल्याचे सांगितले.

प्रश्न - ६ : अधिकारी कोणत्या कामासाठी गावात येत होते ? त्यांनी कोणती माहिती दिली ?

सारणी क्र.(ब - ६)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | जनजागृती करणे, माहिती देणे, दप्तर पाहणे | १८ | ११ | २९ |
| २ | महिला सक्षमीकरणाची माहिती, उद्योग व्यवसाय, बचतगट, आरोग्य, स्वच्छता इ. बाबत मार्गदर्शन करण्यासाठी | ०८ | २५ | ३३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | टाकी, जॅकवेल, फिल्टर हाऊसचे काम पाहण्यासाठी | १४ | ०४ | १८ |

सारणी क्र. (ब - ६) वरुन असे स्पष्ट होते की, सर्वच्या सर्व उत्तरदात्यांना अधिकारी कोणत्या कामासाठी गावाला भेट देतात याची कल्पना आहे. २९ उत्तरदात्यांनी जनजागृती करणे, प्रकल्पाची माहिती देणे, दप्तर पाहणे यासाठी अधिकारी गावाला भेट देत असल्याचे सांगितले. महिला सक्षमीकरणाची माहिती देणे, बचतगट, उद्योग व्यवसाय उभारणी, आरोग्य, स्वच्छता इ. बाबत मार्गदर्शन करण्यासाठी अधिकारी गावात येत असल्याचे ८ पुरुष व २५ महिला उत्तरदात्यांनी सांगितले. १८ उत्तरदात्यांनी पाण्याची टाकी, जॅकवेल, फिल्टर हाऊसचे काम पाहण्यासाठी अधिकारी गावात येतात असे सांगितले. अधिकारी कोणत्या कामासाठी गावात येतात हे माहित नाही असे उत्तर एकाही उत्तरदात्याने दिले नाही.

प्रश्न - ७ : पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन व व्यवस्थापन यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे ?

सारणी क्र. (ब - ७)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | मिटर पद्धती, नळांना तोटया बसविणे | ३८ | ३९ | ७७ |
| २ | माहित नाही | ०२ | ०१ | ०३ |

सारणी क्र. (ब - ७) वरुन असे लक्षात येते की, प्रश्नावलीमध्ये सहभागी झालेल्या ४० पुरुष उत्तरदात्यांपैकी ३८ उत्तरदात्यांनी पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन व व्यवस्थापन होण्यासाठी नळांना तोट्या बसविणे व मिटर पद्धतीचा अवलंब केल्याचे सांगितले. हेच उत्तर ४० पैकी ३९ महिला उत्तरदात्यांनी दिले. एकूण तीन उत्तरदात्यांनी

नेमकी कोणती उपाययोजना केली आहे हे माहित नसल्याचे सांगितले. त्यामध्ये २ पुरुष व १ महिलेचा समावेश आहे.

प्रश्न - ८ : नियमित पाणीपट्टी भरता का ?

सारणी क्र. (ब - ८)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | ३८ | ३४ | ७२ |
| २ | नाही | ०२ | ०६ | ०८ |

सारणी क्र. (ब - ८) वरुन असे लक्षात येते की, आपण नियमित पाणीपट्टी भरता का? या प्रश्नाचे उत्तर ३८ पुरुष व ३४ महिला असे एकूण ७२ जणांनी होय असे दिले आहे. २ पुरुष व ६ महिलांनी पाणीपट्टी भरत नसल्याचे सांगितले.

प्रश्न - ९ : प्रकल्पातून आपला कोणत्या प्रकारचा विकास झाला आहे ?

सारणी क्र. (ब - ९)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | पाण्याची सोय झाली, शौचालयांची सुविधा, नेतृत्व विकास, महिला सक्षमीकरण | १८ | १५ | ३३ |
| २ | पाणी मिळाले, स्वच्छता झाली | १२ | ०६ | १८ |
| ३ | बचतगट वाढले, महिलांना व्यवसाय मिळाला | ०४ | १२ | १६ |
| ४ | सामाजिक दर्जा वाढला, लोकसहभाग वाढला, विकासकामे झाली | ०८ | ०५ | १३ |

सारणी क्र. (ब - ९) वरुन असे दिसते की, जलस्वराज्य प्रकल्पामुळे आमची पाण्याची सोय झाली, शौचालयांची सुविधा, नेतृत्व विकास, महिला सक्षमीकरण झाले असे उत्तर १८ पुरुष व १५ महिला उत्तरदात्यांनी दिले. १२ पुरुष व ६ महिलांनी पाणी मिळाले, स्वच्छता झाली असे उत्तर दिले. ४ पुरुष व १२ महिला अशा एकूण १६ उत्तरदात्यांनी बचतगट वाढले, महिलांना व्यवसाय प्राप्त झाला असे उत्तर दिले. सामाजिक दर्जा वाढला, लाकसहभाग वाढला, विकासकामे झाली अशा प्रकारची उत्तरे ८ पुरुष व ५ महिला अशा एकूण १३ उत्तरदात्यांनी दिली.

प्रश्न - १० : प्रकल्पाच्या कामकाजावर कोणाकडून टीका करण्यात आली आहे का ?

सारणी क्र. (ब - १०)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | पदाधिकारी | ० | ०१ | ०१ |
| २ | अधिकारी | ०३ | ० | ०३ |
| ३ | ग्रामस्थ | १० | ०८ | १८ |
| ४ | नाही | ३३ | २५ | ५८ |

सारणी क्र. (ब - १०) वरुन असे स्पष्ट होते की, पदाधिकाऱ्यांकडून प्रकल्पाच्या कामकाजावर टीका झाली असे उत्तर एका महिला उत्तरदात्याने दिले. अधिकाऱ्यांकडून कामावर टीका झाल्याचे उत्तर ३ पुरुषांनी दिले. ग्रामस्थांनी तक्रार केल्याचे १० पुरुष व ८ महिलांनी सांगितले. ३३ पुरुष व २५ महिला उत्तरदात्यांनी प्रकल्पाच्या कामावर कोणत्याही प्रकारची टीका झाली नसल्याचे सांगितले. एकूण ५८ उत्तरदात्यांना प्रकल्पाच्या कामावर कोणाकडूनही टीका झाली नाही, कोणी तक्रार केली नाही असे वाटते.

प्रश्न - ११ : आपल्या घरी वैयक्तिक शौचालय आहे का ?

सारणी क्र. (ब - ११)



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्पापूर्वी होते | ०९ | ०६ | १५ |
| २ | प्रकल्पानंतर | २८ | ३२ | ६० |
| ३ | अद्याप नाही | ०३ | ०२ | ०५ |

सारणी क्र. (ब - ११) वरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्प गावात सुरु होण्यापूर्वी ८० उत्तरदात्यांपैकी ९ पुरुष व ६ महिला अशा एकूण १५ उत्तरदात्यांकडे वैयक्तिक शौचालय होते. गावात प्रकल्प सुरु झाल्यानंतर निर्मलची मोहिम सुरु झाली. त्यानंतर वैयक्तिक शौचालये बांधल्याचे २८ पुरुष व ३२ महिला अशा ६० उत्तरदात्यांनी सांगितले. अद्याप घरी वैयक्तिक शौचालय नसल्याचे ५ लोकांनी सांगितले. त्यामध्ये ३ पुरुष व २ महिलांचा समावेश आहे.

## क) महिला सक्षमीकरणासंदर्भात :

प्रश्न - १ : महिला ग्रामसभेसाठी आपण नियमित उपस्थित राहता का ?

सारणी क्र. (क - १)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | ०५ | ३३ | ३८ |
| २ | नाही | ३५ | ०७ | ४२ |

सारणी क्र. (क - १) वरुन असे लक्षात येते की, महिला ग्रामसभेसाठी ४० पुरुष उत्तरदात्यांपैकी ५ उत्तरदाते उपस्थित राहत होते. आपण महिला ग्रामसभेसाठी उपस्थित राहत असल्याचे ४० पैकी ३३ महिलांनी सांगितले. महिला ग्रामसभा ही फक्त महिलांची असल्याने तेथे पुरुषांची उपस्थिती आवश्यक नाही. ८० पैकी ३८ उत्तरदात्यांनी आम्ही महिला ग्रामसभेसाठी उपस्थित राहतो असे सांगितले.

प्रश्न - २ : बचतगटात कधी सहभागी झालात ?

सारणी क्र. (क - २)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्पापूर्वी | ० | ०७ | ०७ |
| २ | प्रकल्पानंतर | ० | २८ | २८ |
| ३ | अद्याप नाही | ० | ०५ | ०५ |

सारणी क्र. (क - २) वरुन असे स्पष्ट होते की, रेंदाळमध्ये फक्त महिलांचे बचतगट आहेत. कारण सर्वच्या सर्व पुरुष उत्तरदात्यांनी आपण प्रकल्पापूर्वी किंवा त्यानंतर बचतगटात सामील झाले नसल्याचे सांगितले. ७ महिला जलस्वराज्य प्रकल्प गावात सुरु होण्यापूर्वी बचतगटात होत्या. ४० पैकी २८ महिला प्रकल्पातंर्गत सुरु झालेल्या बचतगटांमध्ये समाविष्ट

झाल्या आहेत. ५ महिला अद्यापही बचतगटात सहभागी झालेल्या नाहीत.

प्रश्न - ३ : उद्योग व्यवसायाच्या उभारणीसाठी बिजभांडवल घेण्यात आले आहे का ?

सारणी क्र. (क - ३)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | ० | २२ | २२ |
| २ | नाही | ० | १८ | १८ |

सारणी क्र. (क - ३) वरुन असे लक्षात येते की, हा प्रश्न पुरुषांना लागू होत नाही. महिला सक्षमीकरणांतर्गत व्यवसाय उभारणीसाठी महिलांनाच कर्ज दिले जाते. त्यामुळे ४० पुरुषांनी या प्रश्नाला नाही असे उत्तर दिले आहे. ४० पैकी २२ महिलांनी उद्योग व्यवसायाच्या उभारणीसाठी कर्ज घेतल्याचे सांगितले. १८ महिलांनी बिजभांडवल घेतले नसल्याचे सांगितले.

प्रश्न - ४ : जलस्वराज्य प्रकल्पा व्यतिरिक्त इतर बॅकांकडून व्यवसायासाठी कर्ज घेण्यात आले आहे का ?

सारणी क्र. (क - ४)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | २६ | १७ | ४३ |
| २ | नाही | १४ | २३ | ३७ |

सारणी क्र. (क - ४) वरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्पा व्यतिरिक्त एकूण ४३ लोकांनी व्यवसायासाठी इतर बॅकांकडून कर्ज घेतलेले आहे. त्यामध्ये २६ पुरुष व १७ महिलांचा समावेश आहे. १४ पुरुष व २३ महिलांनी व्यवसायासाठी कोणत्याही बॅकेचे किंवा इतर कुठल्याही पतसंस्थेचे कर्ज घेतले नसल्याचे सांगितले.

प्रश्न - ५ : आपण कोणता व्यवसाय सुरु केला आहे ?

सारणी क्र. (क - ५)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | चांदी व्यवसाय, शिवणकाम, दुग्धव्यवसाय, किराणा दुकान, रेक्झीन बॅग इ. | ० | २२ | २२ |
| २ | कोणताही नाही | ० | १८ | १८ |

सारणी क्र. (क - ५) वरुन असे लक्षात येते की, ४० पैकी २२ महिलांनी प्रकल्पातंर्गत कर्ज घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु केला आहे. चांदी व्यवसाय, शिवणकाम, दुग्धव्यवसाय, किराणा दुकान, रेक्झीन बॅग तयार करणे, बेकरी प्रॉडक्ट्स बनविणे अशा विविध उद्योगांचा त्यामध्ये समावेश आहे. १८ महिलांनी आम्ही कोणत्याही प्रकारचा उद्योग व्यवसाय करत नसल्याचे सांगितले.

प्रश्न - ६ : व्यवसायातून आपल्याला नफा प्राप्त झाला आहे का ?

सारणी क्र. (क - ६)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | होय | ० | २२ | २२ |
| २ | नाही | ० | ० | ० |

सारणी क्र. (क - ६) वरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्पातंर्गत विविध व्यवसाय प्रशिक्षणे महिलांना देण्यात आली. त्यातून ४० पैकी २२ महिलांनी जलस्वराज्य प्रकल्पातून बिजभांडवल किंवा इतर बॅकांकडून कर्ज घेऊन व्यवसाय सुरु केले आहेत. त्या व्यवसायातून सर्व खर्च जाऊन फायदा होतो का? असे विचारले असता सर्व २२ महिलांनी फायदा होतो असे उत्तर दिले आहे.

प्रश्न - ७ : महिला सक्षमीकरणाचे कोणत्या प्रकारचे काम झाले आहे ?

सारणी क्र. (क - ७)

| अ. क्र. | उत्तराचे स्वरुप | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | महिलांना व्यवसाय मिळाला, नेतृत्व विकास, विविध विषयांवर मार्गदर्शन मिळाले, बचतगट वाढले | २२ | २८ | ५० |
| २ | गावविकासात सहभागी होता आले | ०८ | १२ | २० |
| ३ | धाडस वाढले, सामाजिक दर्जा वाढला | ०४ | ०६ | १० |

सारणी क्र. (क - ७) असे स्पष्ट होते की, या प्रश्नाचे उत्तर सर्वच्या सर्व उत्तरदात्यांनी होय असे दिले आहे. त्यांच्या उत्तरामध्ये वैविध्य आहे. २२ पुरुष व २८ महिलांनी जलस्वराज्य प्रकल्पामुळे महिलांना व्यवसाय मिळाला, नेतृत्व विकास झाला, महिलांना आरोग्य,

शिक्षण, बचतगट, सक्षमीकरण या महत्वाच्या विषयांवर मार्गदर्शन मिळाले, बचतगटांची संख्या वाढली असे उत्तर दिले आहे. ८ पुरुष व १२ महिलांनी प्रकल्पामुळे महिलांना गावविकासात सहभागी होता आले असे उत्तर दिले. ४ पुरुष व ६ महिला अशा एकूण १० उत्तरदात्यांनी महिलांचे धाडस वाढले, त्यांच्या सामाजिक दर्जात वाढ झाली असल्याचे सांगितले. सर्वच उत्तरदात्यांना महिला सक्षमीकरणामुळे महिलांच्या विकासाचे काम झाले आहे असे वाटते.

## ४.४ समारोप :

या प्रकरणात रेंदाळने विकासकामांसाठी राबविलेल्या उपक्रमांचे वर्गीकरण केले आहे. त्यासाठी ८० ग्रामस्थांकडून प्रश्नावली भरुन घेण्यात आली. त्यामध्ये पुरुष व महिला अशी विभागणी करुन त्यांच्याकडून समान प्रश्नावल्या भरण्यात आल्या. जलस्वराज्य प्रकल्पाबद्दल त्यांना काय वाटते ? प्रकल्पातंर्गत गावाचा विकास झाला आहे का? हे पाहण्यासाठी प्रश्नावली भरुन घेण्यात आली. त्यांनी दिलेल्या उत्तरांचे विश्लेषण करणे सोपे जावे यासाठी प्रश्नावलींचे वर्गीकरण करणे आवश्यक होते. एकूण २८ प्रश्नांचे वर्गीकरण या प्रकरणात करण्यात आले आहे. पुढील प्रकरणात प्रस्तुत प्रकरणातील वर्गीकरणावरुन विकासकामांचे विश्लेषण केले आहे.

# संदर्भसूची


१. ४० पुरुष व ४० महिला उत्तरदात्यांकडून भरण्यात आलेली प्रश्नावली, दि. २६/०२/०९ व दि. ०५/०३/०९

२. तथ्य संकलनासाठी तयार करण्यात आलेली प्रश्नावली

३. पाटील शिवाजी , पाणीपुरवठा व स्वच्छता समिती अध्यक्ष, ग्रा.पं. रेंदाळ यांचेशी चर्चा, दि. २६/०२/०९

४. Monthly Progress Report, Jalswarajya Project, Zilla Prishad, Kolhapur , Dec.2008 To March 2009